**श्री.चेतन महेंद्र कांबळे, वरिष्ठ लिपीक/**
**मुं.इ.दु.व पु.मंडळ यांना वरिष्ठ लिपीक**
**या पदाचा मानीव दिनांक देण्याबावत.**

**आदेश:-**

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ०५१**
**आदेश क्र.प्राधि/मा.दि./व.लि./२०२६/** 2201701 **/प्र.८.**
**दिनांक:-** 25.03.2026

**संदर्भ:** १. श्री.चेतन महेंद्र कांबळे, वरिष्ठ लिपीक/मुं.इ.दु.व पु.मंडळ यांचा दि.०२.०५.२०२४ रोजीचा विनंती अर्ज.

२. सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन-१२, दि.०१.०८.२०१९.

३. महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली २०२१.

४. अतांत्रिक संवर्गातील म्हाडा प्राधिकरणातील कर्मचारी यांना मानीव दिनांक देण्याबाबतची विभागीय पदोन्नती निवड समितीची दि.०४.०२.२०२६ रोजीची बैठकीचे मंजूर इतिवृत्तांत.

**पार्श्वभूमी:-**

श्री चेतन महेंद्र कांबळे, वरिष्ट लिपीक/मुं.इ.दु. व पु.मंडळ यांनी प्रशासन विभागास विनंती अर्जान्वये त्यांना मानीव दिनांक मिळण्याबाबत व ज्येष्ठतासूची सुधारीत करण्याबाबत निवेदन सादर केले होते.

म्हाडा प्राधिकरणाच्या नियत आस्थापनेवर श्री चेतन महेंद्र कांबळे यांची कनिष्ट लिपीक-टंकलेखक या संवर्गात दि.१३.०५.२०१६ रोजीच्या आदेशान्वये सरळसेवेने नेमणूक करण्यात आलेली आहे. प्राधिकरणाच्या नियत आस्थापनेवरील कनिष्ट लिपीक-टंकलेखक या संवर्गातील कर्मचाऱ्यांची माहे डिसेंबर २०२० अखेरची तात्पुरती ज्येष्ठतासूची प्राधिकरणाकडून कार्यालयीन आदेश क्र.प्राधि/ज्ये.सू./२०२१/३८८/प्र.१२, दि.०१.०२.२०२१ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदरहू यादीमध्ये अनु.क्र.५३ वर श्री दिपक दिनकर मुळे यांचा सध्याच्या पदावरील नेमणूकीचा दि.१३.०५.२०१६ असा असून शेरामध्ये सरळसेवा असे नमूद करण्यात आलेले आहे. तसेच अनु.क्र.५४ वर श्री चेतन महेंद्र कांबळे यांचे नाव असून त्यांचा सध्याच्या पदावरील नेमणूकीचा दि.१३.०५.२०१६ असा नमूद असून शेरामध्ये सरळसेवा असे नमूद आहे. तदनंतर अनु.क्र.५५ वर श्री विवेक भास्कर चन्ने यांचे नाव असून त्यांचा सध्याच्या पदावरील नेमणूकीचा दि.१३.०५.२०१६ असा नमूद असून शेरामध्ये सरळसेवा असे नमूद आहे. सदरहू ज्येष्ठतासूची ही कनिष्ट लिपीक-टंकलेखक या संवर्गातील माहे डिसेंबर २०२० अखेरची आहे.

प्राधिकरणाच्या नियत आस्थापनेवरील वरिष्ट लिपीक या संवर्गातील कर्मचाऱ्यांची माहे डिसेंबर २०२३ अखेरची तात्पुरती ज्येष्ठतासूची प्राधिकरणाकडून कार्यालयीन आदेश क्र.प्राधि/ज्ये.सू./२०२४/८१९/प्र.१२, दि.०३.०४.२०२४ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदरहू वरिष्ट लिपीक संवर्गातील ज्येष्ठतासूची मधील यादीमध्ये श्री दिपक दिनकर मुळे यांचा अनु.क्र.२३१ आहे व सध्याच्या पदावरील त्यांच्या पदोन्नतीने नेमणूकीचा दि.०२.०८.२०२१ असा नमूद असून, श्री.विवेक भास्कर चन्ने यांचा अनु.क्र.२३२ आहे व सध्याच्या पदावरील त्यांच्या पदोन्नतीने नेमणूकीचा दि.०२.०८.२०२१ असा नमूद असून तसेच श्री चेतन महेंद्र कांबळे यांचा अनु.क्र.२४३ व सध्याच्या पदावरील त्यांच्या पदोन्नतीने नेमणूकीचा दि.२४.१२.२०२१ असा नमूद आहे.

म्हाडा प्राधिकरण व प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांची अतांत्रिक संवर्गातील पदोन्नती निवड समितीची बैठक (DPC) ही दि.०२.०७.२०२१ रोजी घेण्यात आलेली आहे. सदरहू बैठकीमध्ये कनिष्ट लिपीक-टंकलेखक (गट-क) या संवर्गातून वरिष्ट लिपीक (गट-क) या संवर्गात पदोन्नती दिलेल्या आहेत. सदरील बैठकीमध्ये एकूण ९२ पदे

पदोन्नतीने भरण्याकरीता उपलब्ध होती. (१८ पदे निव्वळ रिक्त व ७४ पदे संभाव्य पदोन्नतीने रिक्त) सदरहू पदोन्नती बैठकीसमोर एकूण ८१ कनिष्ट लिपीक-टंकलेखक कर्मचारी यांची यादी निवड समितीसमोर सादर करण्यात आली. सदरहू विभागीय पदोन्नती समितीसमोर म्हाडा प्राधिकरणाच्या नियत आस्थापनेवरील कनिष्ट लिपीक-टंकलेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांची माहे डिसेंबर २०२०अखेरची अंतिम ज्येष्टतासूची सादर करण्यात आलेली होती. सदरहू ज्येष्टतासूचीमध्ये अनु.क्र. ५३ वर श्री दिपक दिनकर मुळे, अनु.क्र.५४ वर श्री चेतन महेंद्र कांबळे व अनु.क्र.५५ वर श्री विवेक भास्कर चन्ने असा क्रम नमूद होता. विभागीय पदोन्नती समितीने सदरहू कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल व पदोन्नती निकष विचारात घेऊन वरिष्ट लिपीक (गट-क) या संवर्गात ६१ कर्मचारी व प्रतिक्षा यादीवर १९ कर्मचारी यांना निवडसूचीवर घेण्यास मान्यता दिली. सदरहू निवडसूचीवर श्री दिपक दिनकर मुळे, श्री चेतन महेंद्र कांबळे **(सेवा नियमीतीच्या अधिन राहून)** व श्री विवेक भास्कर चन्ने यांना पदोन्नतीसाठी पात्र केल्याचे दि.०२.०७.२०२१ रोजीच्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीमधील इतिवृत्तांतानूसार दिसून येते.

तदनंतर म्हाडा प्राधिकरणाकडून कनिष्ठ लिपीक-टंकलेखक (गट-क) या संवर्गातील कर्मचारी यांना वरिष्ट लिपीक (गट-क) या संवर्गात प्राधिकरणाचे आदेश क्र.प्राधि/पदोन्नती/२०२१/२०३०/प्र.८, दि.०२.०८.२०२१ अन्वये एकुण ५८ कर्मचारी यांना पदोन्नती देण्यात आलेली आहे. सदरहू पदोन्नती आदेशामध्ये अनु.क्र.४८ वर श्री दिपक दिनकर मुळे व अनु.क्र.४९ वर श्री विवेक भास्कर चन्ने यांचा समावेश आहे. म्हाडा प्राधिकरणाच्या नियत आस्थापनेवरील वरिष्ट लिपीक या संवर्गातील कर्मचाऱ्यांची माहे डिसेंबर २०२१ अखेरची अंतिम ज्येष्टतासूची प्राधिकरणाकडून दि.०७.०४.२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदरहू यादीमध्ये अनु.क्र.२८० वर श्री दिपक दिनकर मुळे यांचे नाव असून अनु.क्र.२८१ वर श्री विवेक भास्कर चन्ने यांच्या नावाचा समावेश आहे.

म्हाडा प्राधिकरणाच्या नियत आस्थापनेवरील सदरहू कनिष्ट लिपीक-टंकलेखक (गट-क) या संवर्गातील कर्मचारी यांना वरिष्ठ लिपीक (गट-क) या संवर्गात प्राधिकरणाचे आदेश क्र.प्राधि/पदोन्नती/२०२१/३५२९/प्र.८, दि.२४.१२.२०२१ अन्वय एकुण १६ कर्मचारी यांना पदोन्नती देण्यात आलेली आहे. सदरहू पदोन्नती आदेशामध्ये अनु.क्र.२ वर श्री चेतन महेंद्र कांबळे यांचे नाव नमूद आहे. म्हाडा प्राधिकरणाच्या नियत आस्थापनेवरील वरिष्ट लिपीक या संवर्गातील कर्मचाऱ्यांची माहे डिसेंबर २०२१ अखेरची अंतिम ज्येष्टतासूची प्राधिकरणाकडून दि.०७.०४.२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदरहू यादीमध्ये अनु.क्र.२८० वर श्री दिपक दिनकर मुळे यांचे नाव असून अनु.क्र.२८१ वर श्री विवेक भास्कर चन्ने यांच्या नावाचा समावेश आहे. तसेच अनु.क्र.२९२ वर श्री चेतन महेंद्र कांबळे, वरिष्ट लिपीक यांचे नाव निर्दशनास येते.

महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्टतेचे विनियमन) नियमावली, २०२१ मधील **नियम- ४ (४) (अ) पदोन्नत झालेल्या शासकीय कर्मचाऱ्याचा ज्येष्ठतेचा मानीव दिनांक:-** (अ) जेव्हा कोणत्याही निवडसूचीप्रमाणे जे दोन किंवा अधिक शासकीय कर्मचारी कोणतेही वरचे पद, संवर्ग किंवा सेवा यातील पदोन्नतीसाठी पात्र आहेत. अशांना अशी वरची पदे, संवर्ग किंवा सेवा यामध्ये पदोन्नती मिळाली असेल आणि वेगवेगळया दिनांकास ते पदोन्नतीच्या पदावर रुजू झाले असतील आणि जर प्रत्यक्षात रुजू झाल्याचे दिनांक कालानुक्रमे नियम ३ मधील पोटनियम (२) मधील खंड (ब) मधील उपखंड (II) मध्ये नमूद केल्याप्रमाणे निर्धारित केलेल्या त्यांच्या आपआपसातील ज्येष्टताक्रमांशी अनुरुप नसतील तर एखादी ज्येष्ट व्यक्ती त्याच्यापेक्षा कनिष्ट असलेल्या व्यक्तीच्या नंतर कामावर रुजू झाली असेल, तर तिला, कनिष्ट असलेली व्यक्ती ज्या दिनांकास कामावर रुजू झाली असेल, तो दिनांक त्याच्या नियुक्तीचा मानीव दिनांक म्हणून नेमून दिला जाईल. परंतु विहित मुदतीत पदोन्नतीच्या पदावर रुजू न होण्यास, संबंधित शासकीय कर्मचारी स्वत: जबाबदार असल्याचे आढळून आल्यास त्याची ज्येष्ठता ही तो पदोन्नतीच्या पदावर प्रत्यक्ष रुजू झाल्याच्या दिनांकानूसार निर्धारित केली जाईल.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन-१२, दि.०१.०८.२०१९ मधील नमूद करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार विभागीय पदोन्नती समितीच्या कार्यक्षेत्रामध्ये मानीव दिनांकाचे प्रस्ताव विचारात घेणे व सेवाप्रवेश नियमाच्या तरतुदीनुसार व सामान्य प्रशासन

विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश/मार्गदशक सुचना विचारात घेऊन पदोन्नतीचा मानीव दिनांक देण्यासाठी नियुक्ती प्राधिकाऱ्यास शिफारस करणे असे स्पष्टपणे नमूद करण्यात आलेले आहे.

सबब वरील नमूद केलेल्या सर्व वस्तुस्थितीवरुन श्री चेतन महेंद्र कांबळे, वरिष्ठ लिपीक यांना पदोन्नतीसाठी वरिष्ठ लिपीक या संवर्गातील दि.०२.०८.२०२१ रोजीचा मानीव दिनांक देणे क्रमप्राप्त ठरते.

**आदेश:-**

१/- सबब वरीलप्रमाणे नमूद करण्यात आलेली वस्तुस्थिती ही दि.०४.०२.२०२६ रोजी विभागीय पदोन्नती निवड समितीसमोर सादर करण्यात आली. विभागीय पदोन्नती निवड समितीने उक्त नमूद सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.०१.०८.२०१९ व महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१ तरतूदींच्या अधिन राहून श्री. चेतन महेंद्र कांबळे यांना वरिष्ठ लिपीक (गट-क) या पदाचा दि.०२.०८.२०२१ हा मानीव दिनांक देण्यास मान्यता दिली.

२/- म्हाडा प्राधिकरणाच्या नियत आस्थापनेवरील वरिष्ठ लिपीक या संवर्गातील कर्मचाऱ्यांची माहे डिसेंबर २०२३ अखेरची अंतिम ज्येष्ठतासूची प्राधिकरणाकडून दि.२३.०४.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली असून सदरहू ज्येष्ठतासूचीमध्ये श्री. चेतन महेंद्र कांबळे यांच्या नावाचा समावेश अनु.क्र.२२९ वरील श्री. दिपक दिनकर मुळे (वरिष्ठ लिपीक) यांच्या नावाच्या नंतर व अनु.क्र.२३० वरील श्री विवेक भास्कर चन्ने (वरिष्ठ लिपीक) यांच्या नावाच्या अगोदर समावेश करुन शेरा रकानामध्ये सध्याच्या पदावरील नेमणूकीचा दिनांक हा दि.०२.०८.२०२१ असा दर्शविण्यास यावा.

३/- श्री चेतन महेंद्र कांबळे, वरिष्ठ लिपीक यांनी सदरहू कालावधीमध्ये प्रत्यक्ष त्या पदावर काम केलेले नसल्यामुळे त्यांना कोणत्याही प्रकारचा आर्थिक लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

**[ मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्राधिकरण**
**यांचे मान्यतेने ]**

Digitally signed by
Mayur Madhukar Ghodwinde
Date: 25-03-2026 18:26:38

**(मयूर घोडविंदे)**
**प्रशासकीय अधिकारी-२/प्राधिकरण**

**प्रति,**
**श्री चेतन महेंद्र कांवळे, वरिष्ठ लिपीक,**
**(कार्यालय:-कार्यकारी अभियंता/ग-दक्षिण विभाग/मुं.इ.दु.व पु.मंडळ)**
**(मा.मुख्य अधिकारी/मुं.इ.दु.व पु.मंडळ यांचेमार्फत)**

**प्रत सस्नेह अग्रेषित:-**

१. मा.मुख्य अधिकारी/मुं.इ.दु.व पु.मंडळ
२. उपमुख्य अभियंता/परि-२/मुं.इ.दु.व पु.मंडळ
३. सहमुख्य अधिकारी/मुं.इ.दु.व पु.मंडळ
४. कार्यकारी अभियंता/ग-दक्षिण/मुं.इ.दु.व पु.मंडळ
५. मुख्य लेखाधिकारी/मुं.इ.दु.व पु.मंडळ
६. प्रशासकीय अधिकारी/मुं.इ.दु.व पु.मंडळ

**प्रत:** प्रशासकीय अधिकारी-२/प्रा. यांना माहितीसाठी.
**प्रत:** प्रशासन-१२/प्रा. यांना उपरोक्त आदेशाच्या अनुषंगाने माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.
**प्रत:** प्रशासन-६,९,१०,१३,१४(अ), १४(ब),१७
**प्रत:** निवडनस्ती.